**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. १५३/२०२२**
**निशाणी १६ लगत आदेश**
(अंकुश वि. दगडु व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे वयस्कर व आजारी असून औषधोपचार घेत आहेत. प्रतिवादी क्र. ३ हे त्यांचेसोबत परगावी औषधोपचारासाठी जात असल्याने त्यांना कागदपत्रे घेवून वेळेत कैफियत देता आली नाही. त्यामुळे पतिवादी विरुध्द विना कैफियत चौकशी आदेश पारीत झाला आहे. प्रतिवादी यांनी सदर विलंब जाणून बुजून केलेला नाही. सदरचा आदेश रद्द न झालेस प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विरुध्द पारीत झालेला विना कैफियत चौकशी आदेश रद्द करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे अर्जावरती म्हणणे दाखल करण्यात आले असून त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी यांनी ब–याच मुदती घेतलेल्या असून ते मुद्दाम चालढकल करीत आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात. त्यांचेवरील निष्कर्ष मी

कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत** –

०५. प्रस्तुतचा अर्ज, वादी व प्रतिवादीचे वकीलांचे म्हणणे व दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन मागितला आहे. वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप असल्याचे नमुद केले आहे.

०६. प्रतिवादीतर्फे अर्जात नमुद केलेली कारण संयुक्तिक वाटत असल्या कारणाने तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी त्याच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्याच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. म्हणून प्रतिवादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी मुद्दा क्र. १ यास होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र २ करीता –**

०७. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने प्रतिवादींचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा अर्ज प्रत्येकी रु. २००/–दंड वादीस देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीस दंडाची रक्कम दिलेवर प्रतिवादी यांचे विरुध्द पारीत झालेला विना लेखी कैफियत व विना म्हणणे चौकशी आदेश रद्द करण्यात येतो व प्रतिवादी यांना लेखी कैफियत मांडण्याची परवानगी देण्यात येते.

सांगोला. (श्री. संजय मो. घुगे)
दिनांक – ०७/११/२०२३. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge,<br>Civil Judge, J.D.& J.M.F.C.,<br>Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 07/11/2023 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 07/11/2023 |